| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| CNR No.**MHKO200002032022** | दाखल तारीख | – | १३ | ०६ | २०२२ |
| | नोंदणी तारीख | – | १३ | ०६ | २०२२ |
| | निकाल तारीख | – | १२ | ०५ | २०२६ |
| | कालावधी | | वर्ष | महिने | दिवस. |
| | | | ०३ | १० | २९ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर**
**यांचे न्यायालयात( पिठासीन अधिकारी व्ही.ए.लावंड–कोकाटे )**

**नियमित फौजदारी खटला क्रमांक ४०/२०२२.**
**न्यायनिर्णय निशाणी क्रमांक ५२/ ब.**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक– १२ मे २०२६**

कळे पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रं.२२/२०२२ भारतीय दंड संहिता कलम १४३,१४७,३२४,३२३,५०४,५०६ सह कलम १४९ प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत कळे पोलीस ठाणे,<br>ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | | ॲड. श्री. पी. एच. सावंत |
| आरोपी | १. | संदिप गंगाराम देसाई, व.व.३४, |
| | २. | प्रदिप धोंडीराम देसाई, व.व.३६, |
| | ३. | बाळासो बाबुराव देसाई, व.व.४८, |
| | ४. | विश्वास रंगराव देसाई, व.व.४७, |
| | ५. | धोंडीराम मुलारी देसाई, व.व.६८, |
| | ६. | गंगाराम मुलारी देसाई, व.व.६८ |
| | | सर्व रा. घरपण, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर |
| आरोपीतर्फे वकील | | ॲड. श्री. व्ही.एस. पाटील |

**भाग–ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २२.०३.२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २२.०३.२०२२ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | १३.०६.२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | ०३.११.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | ०६.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | – |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | १२.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | – |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायेजित (Set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संदिप गंगाराम देसाई, | २३.०३.२०२२ | २३.०३.२०२२ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | – | – |
| २. | प्रदिप धोंडीराम देसाई, | | | | निर्दोष मुक्तता | – | – |
| ३. | बाळासो बाबुराव देसाई, | | | | निर्दोष मुक्तता | – | – |
| ४. | विश्वास रंगराव देसाई, | | | | निर्दोष मुक्तता | – | – |
| ५. | धोंडीराम मुलारी देसाई, | | | | निर्दोष मुक्तता | – | – |
| ६. | गंगाराम मुलारी देसाई, | | | | निर्दोष मुक्तता | – | – |

**भाग–क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | उत्तम महादेव गुरव | फिर्यादी व जखमी | ४१ |
| २. | बबन ज्ञानू गुरव | जखमी | ४३ |
| ३. | मंगल बबन गुरव | जखमी | ४४ |
| ४. | संगीता महादेव गुरव | जखमी | ४५ |

**ब–बचावपक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

**क. न्यायालयामार्फत**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

**अभियोगपक्षातर्फे/बचावपक्षातर्फे/न्यायालयातर्फे कागदपत्रांना देण्यात आलेल्या निशाणी**

**अ. अभियोग पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ४६ | जखमी बबन ज्ञानू गुरव यांचे एम.एल.सी. प्रमाणपत्र (आरोपीतर्फे मान्य) |
| २. | ४७ | जखमी संगीता महादेव गुरव यांचे एम.एल.सी. प्रमाणपत्र (आरोपीतर्फे मान्य) |
| ३. | ४८ | जखमी मंगल बबन गुरव यांचे एम.एल.सी. प्रमाणपत्र (आरोपीतर्फे मान्य) |
| ४. | ४९ | जखमी उत्तम महादेव गुरव यांचे एम.एल.सी. प्रमाणपत्र (आरोपीतर्फे मान्य) |

**ब. बचाव पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ४० | मुळ फिर्यादी व आरोपीतर्फे आपसात तडजोडीनुसार काम निकाली करणेस परवानगी अर्ज |
| २. | ५० | मुळ फिर्यादी व आरोपीतर्फे आपसात तडजोड पुरसीस |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | १४ | दोषारोप |
| ३. | १५ ते २० | आरोपींचे निवेदन |

**ड. भौतिक वस्तु**

| अ.क्रं. | मुद्देमाल अर्टीकल नं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | एक चिव्याची काठी तिची लांबी २ फुट ७ इंच असुन तिस दोन गाठ तीन पेरे असलेली जुनी वापरती |
| २. | -- | एक चिव्याची काठी तिची लांबी २ फुट ६ इंच असुन तिस दोन गाठी दोन पेरे असलेली जुनी वापरती |

**न्या य नि र्ण य**
**(दिनांक १२ मे २०२६ रोजी घोषित)**

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३,१४७,३२४,३२३,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केल्याची चौकशी झालेली आहे.

**०२.** अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, आरोपी व फिर्यादी हे एकाच गावचे रहिवशी असुन ऐकमेकाचे ओळखीचे आहेत. दि.१४/०३/२०२२ रोजी सायंकाळी ६.२० वाजातचे सुमारास फिर्यादीचे गावातील प्रदिप धोंडीराम देसाई हा चालवत असलेला टेम्पो नं.एम.एच.११-टी-००९१ रिव्हर्सने घेत असताना

फिर्यादीची पुतणी सई उर्फ भक्ती हिला धडक दिलेने त्यामध्ये ती मयत झाली आहे. त्याबाबत प्रदिप धोंडीराम देसाई याचे विरुध्द कळे पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल आहे. दि.२२/०३/२०२२ रोजी सकाळी ०८.१५ वाजताचे सुमारास घरपण ता. पन्हाळा जि. कोल्हापूर या गावातील गुरव गल्ली कॉर्नर वर फिर्यादीचे घरासमोर रोडवर फिर्यादी व त्याचा चुलता बबन ज्ञानु गुरव तसेच भाऊ अजित गुरव असे टेम्पो नं.एम.एच.११–टी.–००९१ हा व्यंकटेश्वरा दुध व्यावसायिक संस्था येथुन संकलन केलेले दुध घेवुन येत असताना आरोपी नं.१ ला संदिप गंगाराम देसाई याला गाडी रिव्हर्सने पाठीमागे घेवुन जावु नका सरळ तोंडाने गाडी डेअरीकडे नेवुन तेथेच परतुन तशीच सरळ घेवुन जा असे सांगत असताना, आरोपी नं.१ ते ६ यांनी मा. जिल्हाधिकारीसो. कोल्हापूर यांचे बंदी आदेशाचे उल्लंघन करुन बेकायदेशीर एक जमाव जमाव करुन संदिप याने त्याचे हातातील काठीने फिर्यादीला पाठीत व गुडघ्यावर मारले. त्यांचा दंगा ऐकुन घरातील फिर्यादीची पत्नी सरिता गुरव, भावजय नैना गुरव, आई संगिता महादेव गुरव, चुलती मंगल बबन गुरव या बाहेर आल्या. तेव्हा संदिप याचे भाऊबंद बाळासाहेब देसाई, विश्वास देसाई असे काठया घेवुन तेथे आले व तेव्हा बाळासाहेब देसाई याने फिर्यादीचे मानेवर काठीने मारहाण केली तेव्हा फिर्यादीचे चुलते बबन गुरव हे भांडणात सोडवा सोडवी करीत असताना विश्वास देसाई याने त्याचे हातातील काठीने चुलते बबन गुरव यांच्या पाठीत मारले.

०३. तसेच संदिप देसाई याने त्याचे हातातील काठीने फिर्यादीची आईचे दोन्ही हातावर तसेच चुलती मंगल हिचे उजवे हाताचे मनगटावर काठीने मारहाण केली आहे. तसेच प्रदिप देसाई याने फिर्यादीला तसेच त्याचा भाऊ अजित याला लाथा बुक्कयांनी मारहाण केली. त्यानंतर सरदार देसाई याने फिर्यादीचा भाऊ अजित गुरव याला मिठ्ठी मारुन धरले व घरात नेले तेव्हा तेथे आलेल्या धोंडीराम देसाई, गंगाराम देसाई यांनी शिवीगाळ करत फिर्यादी तसेच फिर्यादीचे चुलते यांचे अंगावर धावुन आले तेव्हा विश्वास देसाई याने शिवीगाळ करत चौकात या तुम्हाला दाखवतो असे म्हणुन

धमकी दिली आहे. त्यानंतर आजुबाजुच्या लोकांनी त्यांचा वाद सोडवुन त्यांना घरी नेले. भांडणामध्ये फिर्यादीला तसेच बबन ज्ञानु गुरव, सौ. मंगल बबन गुरव, सौ संगिता महादेव गुरव यांना भांडणामध्ये मारहाण झालेने ते सर्व कळे पोलीस ठाणे येथे आले असता पोलीसांनी त्यांचेवर उपचार होण्यासाठी दवाखाना वर्दी दिलेनंतर त्यांनी तात्काळ प्राथमिक आरोग्य केंद्र कळे येथे उपचारासाठी गेले. तेथे उपचार केलेनंतर फिर्यादीने पोलीस ठाणेत तक्रार दिली.

**०४.** फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपींविरुध्द कळे पोलीस ठाणे गु.र.क्र.२२/२०२२ भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३,१४७,३२४,३२३,५०४,५०६ सह कलम १४९ तसेच मुंबई पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंद झाला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस अंमलदार एस.टी.धनवडे यांनी केला असुन त्यांनी तपासा दरम्यान घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे तपास टिपण्णे नोंदवली, जखमींची वैदयकीय प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे प्राप्त करुन कामात सामील केली व केलेल्या तपासाअंती आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले आहे.

**०५.** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द नि.क्र.१४ नुसार भारतीय दंड संहिता कलम १४३,१४७,३२४,३२३,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवला. आरोपींना दोषारोप मराठीत वाचून व समजावून सांगण्यात आला असता त्यांनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविल्याने तसे त्यांचे निवेदन नि.क्र.१५ ते २० वर नोंदविण्यात आले.

**०६.** फिर्यादी व आरोपी यांनी संयुक्तीक अर्ज नि.क्र.४० दाखल करुन न्यायालयाकडे तडजोडीस परवानगी मागितली असता सदरचा गुन्हा तडजोड पात्र नसल्याने तडजोडीस परवानगी देणेत आली नाही. तद्नंतर अभियोगपक्षाने

आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरिता फिर्यादी व साक्षीदार असा एकुण चार साक्षीदारांचा साक्षीपुरावा नोंदवला. दरम्यान आरोपीतर्फे जखमी बबन ज्ञानू गुरव यांचे एम.एल.सी. प्रमाणपत्र नि.क्र.४६ कडे, जखमी संगीता महादेव गुरव यांचे एम.एल.सी. प्रमाणपत्र नि.क्र.४७ कडे, जखमी मंगल बबन गुरव यांचे एम.एल.सी. प्रमाणपत्र नि.क्र.४८ कडे व जखमी उत्तम महादेव गुरव यांचे एम.एल.सी. प्रमाणपत्र नि.क्र.४९ कडे मान्य केली. फिर्यादी यांनी नि.क्र.५१ कडे पुरसीस दाखल करुन पुरावा बंद करत असलेचे न्यायालयास कळवले. आरोपींविरुध्द सबळ पुराव्याअभावी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब नोंदवणेत येत नसलेबाबत आदेश नि.क्र.१ कडे दि.०६/०४/२०२६ रोजी पारित करणेत आला आहे. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०७.** उपलब्ध पुराव्यावरुन खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष त्या खालील नमूद कारणानुसार नोंदविले आहेत–

| **अ.क्र.** | **<u>प्रश्नबिंदू</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे शाबीत करतात का की, दि.२२/०३/२०२२ रोजी सकाळी ८.१५ वाजताचे सुमारास घरपण,ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील गुरव गल्लीत, फिर्यादी उत्तम यांचे घरासमोर आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा की ज्याचा सामाईक उद्देश फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण करणेचा उद्देश असलेल्या जमावाचा घटक होते व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम १४३ सह कलम १४९ अन्वये अपराध केला? | **नकारार्थी.** |
| २. | अभियोगपक्ष हे शाबीत करतात का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व त्यांनी बेकायदेशीर जमावाचे समान उद्‌दिष्ट साधण्यासाठी फिर्यादी व साक्षीदार यांचेवर हल्ला करुन मारहाण केली व बलप्रयोग किंवा हिंसाचार करुन दंगल केली व त्याद्वारे आरोपींनी | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| | भारतीय दंड संहिता कलम १४७ सह कलम १४९ अन्वये अपराध केला ? | |
| ३. | अभियोगपक्ष हे शाबीत करतात का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व त्यांनी बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपी क्र.१ संदिप, आरोपी क्रं.३ बाळासाहेब यांनी गुन्हयात हत्यार म्हणुन वापरलेस मृत्यू होऊ शकेल अशा प्राणघातक काठीने फिर्यादी उत्तम यांना पाठीत, गुडघ्यावर व मानेवर मारहाण करुन, आरोपी क्रं.४ विश्वास यांनी गुन्हयात हत्यार म्हणुन वापरलेस मृत्यू होऊ शकेल अशा प्राणघातक काठीने साक्षीदार बबन यांना पाठीत मारहाण करुन, आरोपी क्रं.४ संदिप याने गुन्हयात हत्यार म्हणुन वापरलेस मृत्यू होऊ शकेल अशा प्राणघातक काठीने साक्षीदार संगिता यांचे दोन्ही हातांना मारहाण करुन तर साक्षीदार मंगल यांचे उजव्या हाताचे मनगटाला मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापती पोहोचवल्या व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम १४९ अन्वये अपराध केला? | **नकारार्थी.** |
| ४. | अभियोगपक्ष हे शाबीत करतात का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व त्यांनी बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपी क्र.२ प्रदिप याने फिर्यादी उत्तम व साक्षीदार अजित यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम १४९ अन्वये अपराध केला? | **नकारार्थी** |
| ५. | अभियोगपक्ष हे शाबीत करतात का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपी यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन त्यांचा उद्देशपुर्वक | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| | अपमान करुन त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे प्रक्षोभीत केले व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला ? | |
| ६. | अभियोगपक्ष हे शाबीत करतात का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपींनी फिर्यादी यांना ''चौकात या तुम्हाला दाखवतो'' असे म्हणुन जिवे मारणेची धमकी देवुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी |
| ७. | आदेश काय ? | **आरोपींची निर्दोषमुक्तता करणेत येते** |

## का र ण मि मां सा

**प्रश्नबिंदू क्र.१ ते ६ करीताः**

**०८.** ज्याअर्थी प्रश्नबिंदू क्र.१ ते ६ मधील नमुद अपराधासंदर्भातील वस्तुस्थिती व पुरावा हा एकमेकांशी संबंधीत आहे, त्याअर्थी या संदर्भातील विश्लेषणात्मक पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर प्रश्नबिंदूंचे विश्लेषण एकत्रित केले आहे. अभियोगपक्षाने संबंधित अधिनियमातील कलमांच्या परिभाषेत आरोपीचे कृत्य येते हे शंकेपलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. हे पाहण्याकरीता अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

**०९.** प्रस्तुत प्रकरणातील आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने त्यांचा मुख्य साक्षीदार फिर्यादी उत्तम महादेव गुरव **(फिर्यादी/नि.क्र.४१)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, आरोपी हे त्यांच्या गावातील असुन ते एकाच गल्लीत राहतात. दि.२२/०३/२०२२ रोजी

सकाळी ८.१५ चे सुमारास कोणतीही घटना घडली नाही. असे काही घडले नाही की, सदर घटनेमुळे तो जखमी झाला किंवा त्याला माराहाण झालेली आहे. त्याने गैरसमजुतीतुन फिर्याद दिली होती. फिर्यादवर त्याची सही आहे. त्यातील मजकुर त्याला माहित नाही. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य केले नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी नोंदवलेल्या उलटतपासामध्ये कबुल केले की, त्यांच्यात व आरोपींच्यात आजरोजी कोणतेही वाद राहिलेले नाहीत. त्यांच्यात व आरोपीमध्ये संबंध भविष्यात चांगले रहावेत या करिता त्यांनी न्यायालयाबाहेर आपसात तडजोड केलेली आहे.

**१०.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ बबन ज्ञानू गुरव, मंगल बबन गुरव, संगीता महादेव गुरव या साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहाय्य केले नसल्यामुळे त्यांची साक्ष या कामी निरुपयोगी ठरलेली आहे.

**१०.** एकंदरीत अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये तडजोड झाली असल्याने तसेच मुळ फिर्यादी व आरोपी हे एकाच गावातील रहिवाशी असुन आरोपीने त्यांचा दुधाचा टेंम्पो रिव्हर्स घेताना हॉर्न वाजवुन मदतीला एखादया व्यक्तीला उभा करुन टेंम्पो मागे घेतला असता तर आजरोजी सई उर्फ भक्ती ही आज जिवंत राहिली असती. परंतु, आरोपींनी टेंम्पो रिव्हर्स घेताना कोणतीही खबरदारी न घेतल्यामुळे सदर घटनेत सई उर्फ भक्ती या लहान मुलीला तिचे प्राण गमवावे लागले आहेत. मुळात फिर्यादी व आरोपी यांनी त्यांचे भविष्यातील संबंध चांगले रहावे या हेतुने प्रस्तुत प्रकरणात तडजोड केली असुन ते एकमेंकांचे गल्लीत राहणारे असुन आरोपीने भविष्यात वाहन चालवताना योग्य ती खबरदारी घ्यावयाची आहे. प्रकरणात झालेल्या तडजोडीमुळे अभिलेखावर असलेल्या प्रकरणात अभियोगपक्षाने घेतलेल्या साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहाय्य केली नसल्याने त्यांची साक्ष आरोपींविरुध्द गुन्हा सिध्दीकरिता

निरुपयोगी ठरली असल्याने केवळ पुराव्याअभावी आरोपींची प्रस्तुत गुन्हयातुन निर्दोषमुक्तता करणेत येत आहे. सबब, वरील सर्व विवेचनांचा विचार करता **<u>प्रश्नबिंदू क्रं.१ ते ६ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.</u>**

**<u>प्रश्नबिंदू क्र.७ करीताः</u>**

**११.** प्रश्नबिंदू क्र.१ ते ६ च्या उत्तरानुसार अभियोगपक्षाचा आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम १४३,१४७,३२४,३२३,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा सिध्द होण्याइतपत कोणताही सबळ व विश्वासार्ह साक्षी पुरावा प्रस्तुत प्रकरणात आलेला नसल्यामुळे सर्व आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. गुन्हयाच्या कामी जप्त दोन चिव्याच्या काठया हया आजरोजी मूल्यहिन व निरुपयोगी असलेने त्यांचा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणे न्यायोचित होईल. सबब, प्रश्नबिंदू क्र.७ चे उत्तरार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे–

**<u>आदेश</u>**

१. आरोपी क्र.१ संदिप गंगाराम देसाई, आरोपी क्रं.२ प्रदिप धोंडीराम देसाई, आरोपी क्रं.३ बाळासो बाबुराव देसाई, आरोपी क्रं.४. विश्वास रंगराव देसाई, आरोपी क्रं.५ धोंडीराम मुलारी देसाई, आरोपी क्रं.६ गुंगाराम मुलारी देसाई सर्व रा. घरपण, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांची भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम १४३,१४७,३२४, ३२३,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

२. आरोपींचे वैयक्तीक व जामीन बंधपत्रे रद्द करण्यात आले आहेत.

३. जप्त मुद्देमाल १.एक चिव्याची काठी तिची लांबी २ फुट ७ इंच असुन तिस दोन गाठ तीन पेरे असलेली जुनी वापरती, २. एक चिव्याची काठी तिची लांबी २ फुट ६ इंच असुन तिस दोन गाठी दोन पेरे असलेली जुनी वापरती हया मुद्देमाल आजरोजी मूल्यहिन व निरुपयोगी असलेने त्यांचा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणेत यावा.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे पूर्तता करणेकामी प्रत्येकी रु.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व तेवढयाच रक्कमेचा जामीन दयावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by Vaishali Amol Lavand-Kokate
Date: 2026.05.12 18:16:02 +0530

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)

दिनांक –१२.०५.२०२६. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

कळे–खेरीवडे. कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.